जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

## प्रेसनोट क्रमांक - २६८ दिनांक - २२/०६/२०२४

युनिट-५ गुन्हे शाखा, पुणे शहर

### पोलीस कस्टडीतुन पलायन केलेल्या रेकॉर्डवरील आरोपीस अवघ्या ४ तासात केले जेरबंद

दि. २१/०६/२०२४ रोजी हडपसर पो.स्टे. गु.र.नं. १००४/२०२४ भा.द.वि.कलम ३७९ मधील आरोपी नामे **१) संदिप बाबुलाल यादव वय ३० वर्षे रा. जिल्हा परिषद शाळेसमोर, हांडेवाडी चौक, होळकरवाडी, पुणे २) गोविंद उर्फ पिंट्या हनुमंत घोडखे वय २४ वर्षे रा.गल्ली नंबर ५,वरदविनायक कॉलणी,गंगानगर,हडपसर पुणे** यांना ताब्यात घेऊन पुढील तपासकामी हडपसर पोलीस ठाणे यांचे ताब्यात दिले होते.

दि. २२/०६/२०२४ रोजी सुमारे दिड वाजे दरम्यान वर नमुद वाहन चोरीच्या गुन्हयातील आरोपीतांची फिंगरप्रिन्ट काढणेकामी त्यांना हडपसर पोलीसांनी लॉकअपमधुन बाहेर काढले असता पोलीसांची नजर चुकवुन आरोपी नामे गोविंद उर्फ पिंट्या हनुमंत घोडखे पळुन गेल्याने त्याचेविरुध्द हडपसर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. १०१५/२०२४, भा.दं.वि. कलम २२४ प्रमाणे गुन्हा नोंद आहे. दाखल गुन्हयातील नमुद आरोपीचा शोध घेणेकामी हद्दीत नाकाबंदी व पेट्रोलिंग करणेकामी मा. वरिष्ठांनी आदेशित केले.

त्याप्रमाणे लागलीच गुन्हे शाखा, युनिट-५ कडील पोलीस निरीक्षक विश्वजीत काईंगडे यांनी युनिट कडील अधिकारी व अंमलदार यांच्या दोन टिम तयार करुन एक टिम पुणे कॅम्पात व एक टिम पुर्वेला आरोपीचा शोध घेणेकामी रवाना केले. नमुद आरोपीचा शोध घेत असताना पोलीस अंमलदार अमित कांबळे यांना बातमी मिळाली की, रेकॉर्डवरील गुन्हेगार नामे गोविंद उर्फ पिंटया घोडखे हा वडकी येथील सकाळ प्रेसच्या पाठीमागे जंगलामध्ये लपुन बसलेला आहे. अशी बातमी मिळाल्याने आम्ही सदरची बातमी युनिट प्रभारी यांना कळवुन आम्ही लागलीच सकाळ प्रेस, वडकी येथील जंगलात जाऊन आरोपीचा शोध घेतला असता पोलीस स्टाफ ओळखत असलेला आरोपी नामे गोविंद उर्फ पिंट्या घोडखे हा एका झाडा खाली लपुन बसलेला दिसला. पोलीसांना पाहुन पळुन जाऊ लागल्याने आरोपी नामे गोविंद उर्फ पिंट्या हनुमंत घोडखे वय २४ वर्षे रा. गल्ली नंबर ५, वरदविनायक कॉलणी, गंगानगर, हडपसर पुणे यास लागलीच स्टफचे मदतीने ताब्यात घेतले. त्याचेविरुध्द हडपसर पोलीस ठाणे गुन्हा रजि. नं. १०१५/२०२४, भा.दं.वि. कलम २२४ प्रमाणे गुन्हा दाखल असल्याने त्यास पुढील कारवाईकामी हडपसर पोलीस ठाणे यांचे ताब्यात दिला आहे.

सदरची कामगिरी ही मा. पोलीस उपायुक्त,गुन्हे, श्री. अमोल झेंडे, मा. सहायक पोलीस आयुक्त, श्री. सतिश गोवेकर, यांचे मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक विश्वजीत काईंगडे, सहा. पोलीस निरीक्षक कृष्णा बाबर, पोलीस अंमलदार प्रमोद टिळेकर, प्रताप गायकवाड, दया शेगर, विनोद शिवले, अमित कांबळे, अकबर शेख यांनी केलेली आहे.


गुन्हेशाखा युनिट - ५, पुणे शहर पोलीस
पुणे पोलीस